Education, Training & Service Centre for PWDs
अपंग शिक्षण प्रशिक्षण व सेवा सुविधा केंद्र
नवी मुंबई महानगरपालिका
Navi Mumbai Municipal Corporation

Plot No. 3D, Sector- 30A, Vashi Railway Station, Opp. Exit Gate of Raghuleela Mall, Vashi, Navi Mumbai 400703 | Phone : 022-27812962; 27812972 9029417418 Fax: 022-27812962 | nmmc.etc@gmail.com dr.varshabhagat@nmmconline.com

# जाहीर आवाहन

नमुंमपा ईटीसी-केंद्राकडून सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये नमुंमपा क्षेत्रामध्ये वास्तव्य करणारे दिव्यांग मुले, व्यक्ती तथा कुटूंबीयाकरीता विविध दिव्यांग योजना राबविण्यात येत आहे. कोवीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे विविध दिव्यांग योजनांमधील समांतर अटी व शर्तीमध्ये खालीलप्रमाणे काही प्रमाणात शिथीलता करण्यात आलेली आहे.

अ. **समांतर अटी शर्तीमध्ये देण्यात आलेली शिथीलता:**

<table>
<tr><th>क्र.</th><th>अटी शर्ती</th><th>शिथील अटी शर्ती</th></tr>
<tr><td>१.</td><td>अर्जदार नवी मुंबई महापालिका हद्दीतील किमान ५ वर्षाचा रहिवासी असावा.</td><td>शासकीय कर्मचाऱ्यासाठी सदरची अट शिथील करण्यात येत आहे.</td></tr>
<tr><td>२.</td><td>भाडेतत्वावर राहणाऱ्या दिव्यांग व्यक्तींने नोंदणीकृत वास्तव्याचा करारनामा सादर करावा.</td><td>१. तहसीलदार/ नायब तहसीलदार यांच्यामार्फत देण्यात येणारा किमान ०३ वर्षाचा स्थानिक रहिवासी दाखला जोडणे आवश्यक आहे. तसेच किमान ०२ वर्षाचा भाडेतत्वावर असलेल्या घराचा करारनामा सादर करावा. भाडेतत्वावर असलेल्या घराचा करारनामा नोंदणीकृत असणे अनिवार्य नाही.<br>अथवा<br>२. एकूण ०५ वर्षाचे भाडेतत्वावर असलेले घराचा करारनामा सादर करावा. भाडेतत्वावर असलेले घराचा करारनामा नोंदणीकृत असणे अनिवार्य नाही.</td></tr>
<tr><td>३.</td><td>सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत देण्यात येणारा कुटुंबाच्या उत्पन्नाचा दाखला आवश्यक असून कुटुंबिय उत्पन्नाची मर्यादा रु.८,००,०००/-(अक्षरी रुपये आठ लाख मात्र) राहिल.</td><td rowspan="2">सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या मर्यादीत कालावधीकरीता<br>दिव्यांगाकरीता राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांपैकी दिव्यांगाना स्वयंरोजगाराकरीता अर्थसहाय, तीव्र तथा अति तीव्र दिव्यांग मुलांना अर्थसहाय, प्रौढ बेरोजगार दिव्यांगाना उदरनिर्वाह भत्ता योजना, प्रौढ दिव्यांग व्यक्तींना अर्थसहाय योजना, दिव्यांग व्यक्तींना विवाहाकरीता अर्थसहाय योजना तसेच दिव्यांग मुलांच्या पालकांकरीता शिक्षण प्रशिक्षणाकरीता अर्थसहाय या योजनांचे अर्ज स्विकारलेल्या दिनांकापासून उत्पन्नाचा दाखला तसेच स्थानिक रहिवासी दाखला सादर करण्याकरीता ०४ महिन्याचा कालावधी वाढवून देण्यात येत आहे. अर्जदाराने नमुंमपा ईटीसी-केंद्रामार्फत तयार करण्यात आलेल्या नमुन्यामध्ये हमीपत्र देणे आवश्यक आहे.</td></tr>
<tr><td>४.</td><td>तहसीलदार/ नायब तहसीलदार यांच्यामार्फत देण्यात येणारा किमान ०३ वर्षाचा स्थानिक रहिवासी दाखला जोडणे आवश्यक आहे.</td></tr>
</table>

| क्र. | योजनेचे नाव | अटी शर्ती | शिथील अटी शर्ती |
|---|---|---|---|
| ५. | **दिव्यांग मुले व व्यक्तींसाठी शिष्यवृतीकरीता अर्थसहाय** | सदर योजनेतील उपयोजना क्र. ५ ते ९ करीता दिव्यांग विद्यार्थ्यांचे शुल्क भरणा केल्याची पावती जोडणे आवश्यक आहे. | १. सदरच्या योजनामधील सर्वच उपयोजनांमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांचे शुल्क भरणा केल्याची किमान एक महिन्याची पावती जोडणे आवश्यक आहे.<br>२. दिव्यांगास वर्षभरात किती शुल्क भरणा करावयाचे आहे याबाबत शाळा/ महाविद्यालय यांचेकडून प्रमाणित प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे. |
| | | ---- | ३. कुटूंबातील फक्त दोनच दिव्यांग मुलांना या योजनेचा लाभ मिळेल. |
| ६. | **दिव्यांगाना स्वयंरोजगाराकरीता अर्थसहाय योजना** | किमान एक जीएसटी कोटेशन सादर करणे आवश्यक आहे. | किमान एक कोटेशन सादर करणे आवश्यक आहे. |
| ७. | **दिव्यांग व्यक्तींच्या पाल्याकरीता शिष्यवृत्तीकरीता अर्थसहाय** | सदर योजनेतील उपयोजना क्रं. ५ ते ९ करीता दिव्यांग विद्यार्थ्यांचे शुल्क भरणा केल्याची पावती जोडणे आवश्यक आहे. | १. सदरच्या योजनामधील सर्वच उपयोजनांमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांचे शुल्क भरणा केल्याची किमान एक महिन्याची पावती जोडणे आवश्यक आहे.<br>२. दिव्यांगास वर्षभरात किती शुल्क भरणा करावयाचे आहे याबाबत शाळा/ महाविद्यालय यांचेकडून प्रमाणित प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे. |
| | | | ३. दिव्यांग व्यक्तीच्या कुटूंबातील फक्त दोनच मुलांना या योजनेचा लाभ मिळेल. |
| ८. | **तीव्र तथा अति तीव्र दिव्यांग मुलांना अर्थसहाय योजना** | सदरच्या योजनामध्ये मुख्यत्वे तीव्र व अति तीव्र मतिमंद, बहुअपंगत्व, बौध्दीकदृष्टया अक्षम, स्नायुची विकृती, मज्जा संस्थांचा तीव्र आजार, मल्टीपल स्कलेरोसीस, थालेसिमिया, हिमोफिलीया, सिकलसेल ॲनिमिया, ॲसिड हल्ला, मेंदूचा पक्षघात अशा प्रकारचे दिव्यांगत्वा असणाऱ्या वय वर्ष ० ते १८ वयोगटातील दिव्यांग मुलांकरीता राबविण्यात येत आहे | सदरची योजना सन २०२०-२१ पासून **वय वर्ष ० ते १८ वयोगटातील सौम्य ते अतितीव्र सर्व दिव्यांग प्रवर्गातील मुलांकरीता** राबविण्यात येत आहे. |
| ९. | **प्रौढ बेरोजगार दिव्यांगांना उदरनिर्वाह भत्ता योजना** | दिव्यांग व्यक्तींनी विशेष सेवायोजन कार्यालय (Self Employment Exchange) येथे नावनोंदणी केल्याचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे | **सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या मर्यादीत कालावधीकरीता**<br>विशेष सेवायोजन कार्यालय (Self Employment Exchange) येथे नावनोंदणी केल्याचे प्रमाणपत्र सादर करणेबाबतची अट शिथील करण्यात आलेली आहे. |

सही/-

**संचालक**

ईटीसी-अपंग शिक्षण, प्रशिक्षण व सेवासुविधा केंद्र,

नवी मुंबई महानगर पालिका